मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना सन २०२६-२७ मध्ये राबविण्यास रू. १२००.०० लाख निधी वितरणास मान्यता देणेबाबत. (२४०१A७९१)

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मस्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र. मुअप्र २०२६/प्र.क्र.१०५/९अे
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १२ ऑगस्ट, २०२६

वाचा-

१. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.राअअ-१११६/प्र.क्र. २४८/१४अे, दि. २० जून, २०१७
२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. कृप्रधो-२०१७/प्र.क्र.२०८/९ अे, दि. ३१ ऑक्टोबर, २०१७
३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. कृराधो-१४१७/प्र.क्र.१०९/९ अे, दि. ०६ जून, २०१८
४. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. मुअप्र-२०२२/प्र.क्र.६४/९ अे, दि. १७ मे, २०२२
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र. ४०/अर्थ-३, दि. ०९ एप्रिल, २०२६
६. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र. ४०/अर्थ-३, दि. ०७ मे, २०२६
७. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.मुअप्र-२०२६/प्र.क्र. १०५/९अे, दि. १३ मे २०२६
८. कृषि संचालक (कृषि प्रकिया व नियोजन), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा. क्र. /मुकृवअप्रयो/ र-६४१/२०२६, दि. २० मे, २०२६
९. कृषि संचालक (कृषि प्रकिया व नियोजन), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा. क्र. /मुकृवअप्रयो/ र-७५९/२०२६, दि. १० जून, २०२६

प्रस्तावना :-

मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना सन २०२६-२७ मध्ये राज्यात राबविण्याकरिता उपरोक्त वाचा क्र. ७ येथील दि. १३.०५.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू. १८००.०० लाख एवढया रकमेच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कृषि संचालक (कृषि प्रकिया व नियोजन) यांनी उपरोक्त वाचा क्र. ८ व ९ येथील पत्रांन्वये निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. उक्त विनंतीस अनुलक्षून आयुक्त (कृषि) यांना निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याबाबत शासन आता पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना सन २०२६-२७ मध्ये राज्यात राबविण्याकरिता रू. १२००.०० लाख (रूपये बारा कोटी फक्त) एवढा निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

२. संदर्भांकित शासन निर्णय दि. २०/०६/२०१७ व दि. १३/०५/२०२६ अन्वये विहित केलेल्या तरतुदींनुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी.

३.	सदर योजना सन २०२६-२७ मध्ये राबविण्याकरिता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी तर सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४.	आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रकल्पांचे अनुदान रक्कम संबंधित बँकेच्या सबसिडी रिझर्व फंड अकाऊंटमध्ये जमा करण्याची कार्यवाही करावी. तसेच सदर योजनेसाठी उपलब्ध होणारा अर्थसंकल्पीत निधी पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. डी-३,
२४०१-पीक संवर्धन,
(००)(१०२) अन्नधान्य पीके,
(००)(३४) मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना (१००% राज्य योजना)
(२४०१ A ७९१)
३३, अर्थसहाय्य

५.	राज्य शासनाने विहीत केलेले नियम/सुचनांचे पालन करून लेखापरिक्षण करून निधी वितरणाचे उपयोगिता प्रमाणपत्र राज्य शासनास सादर करावे.

६.	सदर आदेश, वित्त विभागाचा अनौ. संदर्भ क्र.३३२/२०२६/व्यय-१, दि. १४.०७.२०२६ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीनुसार तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७ मे, २०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८१२१६५८०६३५४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षंकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Digitally signed by DEEPAK BALKRISHNA RAUT
Date: 2026.08.12 17:00:21 +05'30'

(दिपक बाळकृष्ण राऊत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई-३२.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा. मंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७) मा. विरोधीपक्षनेते, विधानपरिषद/ विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.

८) मा. विधान परिषद/विधानसभा सदस्य, विधानमंडळ सचिवाल, मुंबई.
९) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
१०) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
११) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१२) सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१३) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
१४) संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) सर्व विभागीय कृषि सहसंचालक, महाराष्ट्र राज्य.
१६) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७) सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षण)-१/२, मुंबई/नागपूर.
१९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
२०) संचालक, लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई
२१) सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई.
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
२३) माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई - ३२
२४) कक्ष अधिकारी (का.१४३१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२५) कक्ष अधिकारी (अर्थ.-१३/ व्यय-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२६) कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२७) निवड नस्ती-९अे.